प्रतिक्षमतेचा विस्तारीत लसटोचणी / सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमांतर्गत कार्यरत असलेल्या ४४२ अस्थाई पदांना दि. १.१०.२०१७ ते दि. ३१.१२.२०१७ या कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः अस्थायी २०१७/२६९/ प्र.क्र.१०७/ कु.क.
१० वा मजला, बी विंग, गो. ते. रूग्णालय संकूल इमारत
नवीन मंत्रालय, लो.टि. मार्ग, मुंबई- ४०० ००१
तारीख: २० नोव्हेंबर २०१७

वाचा

1) **सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांकः अस्थायी २०१६/२६९/प्र.क्र.१०७/कु.क. , दि. २० मार्च, २०१७**
2) **सह संचालक, आरोग्य सेवा,(अ. व प्र.),मुंबई पत्र क्रमांक संआसे/आस्था/कक्ष-५/टे-३/४४२/अपदे/४४८१-८२/२०१७, दि. ४.१०.२०१७**
3) **वित्त विभागाचा शासन निर्णय क्रं-पदनि-२०१६/प्र.क्र.०८/आपुक, दि. ०३/१०/२०१७.**
4) **सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांकः अस्थायी-१०८९/१०१७/प्र.क्र.९४/कु.क-२ , दि. ७.९.१९८९**

प्रस्तावना

प्रतिक्षमतेचा विस्तारीत लसटोचणी/ सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमांतर्गत मंजूर असलेल्या ४४२ अस्थायी पदांना संदर्भ क्र. १ अन्वये दि. ०१.०३.२०१७ ते ३०.०९.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या पदांना पुढील मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र. २ अन्वये शासनास प्राप्त झाला आहे. अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत वित्त विभागाने संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना प्राधिकार दिले आहेत. त्यानुसार वरील अस्थायी पदांना पुढील मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन होता.

शासन निर्णय

प्रतिक्षमतेचा विस्तारीत लसटोचणी/ सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी मंजूर असलेल्या ४४२ अस्थायी पदांना वित्त विभागाच्या दि.३.१०.२०१७ च्या शासन निर्णयान्वये दि. १.१०.२०१७ ते दि.३१.१२.२०१७ रोजीपर्यंत पुढे चालु ठेवण्यास या शासन निर्णयान्वये मुदतवाढ देण्यात येत आहे. दरम्यानच्या काळात सुधारित आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेऊन सदर पदांचा विभागाच्या आकृतीबंधात समावेश करण्याबाबत आरोग्य संचालनालयाने सत्वर कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.

२. सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाकरीता ४४२ अस्थायी पदांच्या वेतनावरील खर्च विभागाच्या अर्थसंकल्पात खालील लेखाशिर्ष १ व २ खाली मंजूर केलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

लेखाशीर्ष १ :- आर- १ , २२११- कुटुंब कल्याण-१०३- माता व बाल आरोग्य -(०१) (०४)- प्रतिक्षमतेचा विस्तारीत कार्यक्रम, (२२११ ०३६३) राज्य क्षेत्र

लेखाशीर्ष २ :- आर- १, २२११- कुटुंब कल्याण-१०३- माता व बाल आरोग्य -(०१) (१२)- प्रतिक्षमतेचा विस्तारीत कार्यक्रम, (२२११ ०६२१) स्थानिक क्षेत्र

३. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/आपुक, दि.३.१०.२०१७ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११२०१२४८४७९८१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ujwala Arun Ransing

Digitally signed by Ujwala Arun Ransing
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a7788b3b31e2d9269bcbfd9588a6ee4771341780133d295a56dd4ef476977773, serialNumber=3b8f98f1c182bf458a4deee399a7241b5044aeb09c097bc6d28b58709fe8ef0d, cn=Ujwala Arun Ransing
Date: 2017.11.20 15:31:58 +05'30'

(उज्वला अ. रणसिंग)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ (लेखापरीक्षा / (लेखा अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर
२. अधिदान व लेखा कोषागार, मुंबई
३. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
४. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, पुणे (५ प्रती)
५. सह संचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, आरोगय सेवा संचालनालय, मुंबई
६. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
७. वित्त विभाग (व्यय-१३) मंत्रालय, मुंबई
८. निवडनस्ती (कु.क.)

विवरणपत्र

कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत प्रतिक्षमतेचा विस्तारीत लचटोचणी कार्यक्रम/सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी मंजूर असलेल्या २१२७ पदांपैकी ४४२ अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत.

क्र: अस्थायी-२०१७/प्र.क्र.१०७/कुक, दि. २० नोव्हेंबर,२०१७

अ. क्र.	पदनाम	पदसंख्या	स्थायी	अस्थाई
१	**२**	**३**	**४**	**५**
(१) शासकीय मुख्यालयीन संघटना				
१	उपसंचालक (विलटो), वर्ग-१	१	१	०
२	अधिक्षक, वर्ग-३	१	१	०
३	सांख्यिकी अधिकारी, वर्ग-३	१	१	०
४	आरोग्य पर्यवेक्षक, वर्ग-३	६	५	१
५	वाहन चालक, वर्ग-३	२	१	१
६	कनिष्ठ लिपिक, वर्ग-३	३	३	०
७	शिपाई, वर्ग-४	२	२	०
एकूण (अ)		**१६**	**१४**	**२**
(२) जिल्हा पातळीवरील सद्य:स्थितीखाली चालू असलेला कर्मचारी वृंद				
१	वरिष्ठ स्वच्छता निरिक्षक, वर्ग-	१८	१६	२
२	लस टोचक (आरोग्य कर्मचारी) वर्ग.२	१५०८	१२८४	२२४
३	वाहन चालक, वर्ग-३	२४	२०	४
४	कनिष्ठ लिपिक, वर्ग-३	२४	१८	६
५	वरिष्ठ स्वच्छता निरिक्षक, वर्ग-३	३६	२६	१०
६	गटस्तर पर्यवेक्षक (आरोग्य सहाय्यक) वर्ग-३	३४३	२८८	५५

७	गटस्तर पर्यवेक्षक (आरोग्य सहायक) वर्ग-३	१७	०	१७
८	लस टोचक, वर्ग-३	१००	०	१००
९	शिपाई, वर्ग-४	२५	१९	६
एकूण (ब)		**२०९५**	**१६७१**	**४२४**
(३) सार्वत्रिक लसीकरण				
१	वाहन चालक, वर्ग-३	८	०	८
२	परिचर, वर्ग-४	८	०	८
एकूण (क)		**१६**	**०**	**१६**
एकूण (अ+ब+क)		**२१२७**	**१६८५**	**४४२**